पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/५२७/२०१६
दिनांक – ०८/०७/२०१६

प्रति,
मा**.........................................,**
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - १२/०७/२०१६ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १२/०७/२०१६ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक – २३२**

दिनांक - १२/०७/२०१६ वेळ – दुपारी २.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक १२/०७/२०१६ रोजी दुपारी २.३० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

दिनांक ५/०७/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २३१) चा सभावृतांत कायम करणे.

विषय क्र. १) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२३-२०१५-१६ मधील अ.क्र. २३ अन्वये प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर झोपडपट्टी येथे पुरुषासाठी शहाजी गायकवाड यांच्या घराशेजारी २६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी मे.श्रीयश कंन्स्ट्रक्शन नि.र.रु.४२,०१,३६५/- (अक्षरी र.रु.बेचाळीस लाख एक हजार तीनशे पासष्ट फक्त) पेक्षा १.५०% जास्त या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.४२,६४,३८५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक १२/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. २) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.४/२३-२०१५-१६ मधील अ.क्र.१९ अन्वये प्रभाग क्र.३७ महात्मा फुलेनगर झोपडपट्टीतील संडास ब्लॉक नं.२ (४ सिट्स) पाडून १६ सिट्सचे शौचालय बांधणेकामी मे.व्यंकटेश्वरा कंन्स्ट्रक्शन नि.र.रु.२७,९९,९५०/- (अक्षरी र.रु.सत्ताविस लाख नव्यान्नव हजार नऊशे पन्नास फक्त) पेक्षा १.५०% जास्त या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.२८,४१,९४९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दिनांक १२/०७/२०१६ च्या सभेत घेणेच्या निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. ३) पिंपरी चिंचवड मनपाच्या वैद्यकीय विभागांतर्गत राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजने अंतर्गत वाय.सी.एम.रुग्णालयातील अस्थिरोग विभागासाठी लागणारे इम्प्लान्ट खरेदीबाबत प्रसिध्द केलेल्या ई-निविदा क्र.३/२०१५-१६ मधील लघुत्तम निविदाधारक मे. कोठारी मेडिकल्स यांच्या 283 बाबींकरीता येणा-या र.रु.39,57,532/25, मे. आकाश मेडिकेअर यांच्या 35 बाबींकरीता येणा-या र.रु.6,88,925/-, मे. प्राईम सर्जिकल्स अँन्ड फार्मा. यांच्या 25 बाबींकरीता येणा-या र.रु.1,98,070/-, मे. डिव्हाईन एन्टरप्रायजेस यांच्या 52 बाबींकरीता येणा-या र.रु.5,73,030/-, मे. ऑटोकॅल यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.600/- मे. झेनेसिस मेडिकेअर यांच्या 2 बाबीकरीता येणा-या र.रु. 64,850/-, मे. आकाश मेडिकेअर व मे. प्राईम सर्जिकल (समान दर) यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.5,000/- व मे. कोठारी मेडिकल व मे. डिव्हाईन एन्टरप्रायजेस (समान दर) यांच्या 4 बाबींकरीता येणा-या र.रु.20,400/- व मे. कोठारी मेडिकल व मे. प्राईम सर्जिकल (समान दर) यांच्या एका बाबीकरीता येणा-या र.रु.5,550/- व मे. कोठारी मेडिकल व मे. आकाश मेडिकेअर (समान दर) यांच्या 3 बाबी करीता येणा-या र.रु.40,500/- याप्रमाणे प्राप्त झालेल्या दरांना एक वर्ष कालावधीसाठी मान्यता घेऊन करारनामा करुन खरेदी करणेकामी येणा-या एकूण र.रु. 55,54,457/25 (अक्षरी र.रु. पंचावन्न लाख च्योपन्न हजार चारशे सत्तावन्न पैसे पंचवीस फक्त) रकमेच्या खर्चास व एक वर्ष कालावधीत शस्त्रक्रियेसाठी आवश्यकतेनुसार मंजुर दरानुसार खरेदी करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दि.१२/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. ४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या ओटी विभागातील MAQUET कंपनीच्या ०२ नग Operation Table (Sr.No.00672, 00678) ची दुरुस्ती (स्पेॅअर पार्टस खरेदी + दुरुस्ती) संबंधित उत्पादित कंपनी M/s. Maquet यांचेकडून निविदा न मागवता, करारनामा न करता, थेट पध्दतीने करणेस तसेच सदर Operation Table दुरुस्त करणेकामी संबंधित उत्पादित कंपनीने मागणी केलेप्रमाणे त्यांना १००% आगाऊ रक्कम र.रु.४,०६,४८५/- (अक्षरी र.रु.चार लाख सहा हजार चारशे पंच्याऍशी फक्त) देणेस व सदर दुरुस्तीसाठी होणारा खर्च र.रु.४,०६,४८५/- ला मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.१२/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ५) दिघी गायरान गट क्र.७७ येथे १०,००० वृक्षारोपण करणे व त्याची ३ वर्षे देखभाल करणेचे कामास येणारे प्रति वृक्ष ६१०/- प्रमाणे येणारे र.रू.६१,००,०००/- खर्चास मा.स्थायी समिती ठराव क्र.१३३०८ दि.१०/११/२०१५ अन्वये मान्यता मिळालेली असुन सदर वृक्षारोपण दिघी गायराण ऐवजी जागा बदल करून सी.एम.ई.दापोडी

हद्दीतील सी.ई.डी.यु.२६२ येथे १०,००० वृक्षारोपण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.१२/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्र. ६) मनपाच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक लागणा-या 3 ते 5 वर्षाचे आतिल टुरिस्ट परमिट (पिवळे नंबरप्लेट) असलेल्या 11 टाटा सुमो अथवा तत्सम वाहने (6+1) भाडे तत्वावर घेणेकामी प्रसिध्द करणेत आलेल्या ई-निविदा क्र.15/2015-16 मधील लघुत्तम दर निविदाधारक ओम एंटरप्रायझेस यांचे प्राप्त दर, प्रतिवाहन प्रतिदिन 60 किमीसाठी र.रु.1500/- प्रमाणे व प्रति 60 किमी पुढील अंतरासाठी र.रू.8.50/- दर या प्रमाणे एकूण र.रू.99,00,000/- खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

( दि.१२/०७/२०१६ च्या सभेत घेणेचे निर्णयाप्रमाणे )

विषय क्र. ७) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत मनपाच्या विविध मिळकती/उदा.करसंकलन विभागीय कार्यालय, पाणी पुरवठा, कार्यशाळा इ.ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचे काम ठेकेदारी पध्दतीने ई-निविदा सुचना क्र. २/२०१४-२०१५ अन्वये ४३१ रखवालदार मदतणीस कर्मचारी पुरवून कामकाज चालू आहे. परंतू JnNURM - BSUP शहर झोपडपट्टी पुर्नवसन अंतर्गत से.क्रं.२२ निगडी येथे ४३ इमारती बांधण्यात आलेल्या असून संरक्षण खात्याच्या रेड झोन हद्दीमध्ये येत असल्याने मा.उच्च न्यायालय,मुंबई सुरु असलेले बांधकाम तसेच ठेवणेबाबत व पुर्ण झालेल्या इमारतींचे वाटप न करणेबाबत स्थगिती आदेश दिलेले आहेत, परंतू सदर ठिकाणी भविष्यामध्ये अनैतिक बाबी घडुन अपघात होवू नये व इमारती सुरक्षित राहणेकामी स्थापत्य BSUP प्रकल्प विभागाकडील पत्र क्रं स्थआ/BSUP प्र/१७९/२०१६ दि.२४/५/२०१६ चे पत्रान्वये विभागास कळविले आहे, त्यानुसार सदर ठिकाणची सुरक्षा व्यवस्था करणे करीता १) मे.युनिक डेल्टा सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.यांना ०५, २) मे.नॅशनल सिक्युरिटी सर्व्हिसेस यांना ०७, व ३) मे.शुभम उद्योग यांना ०६ प्रमाणे एकूण जादा १८ रखवालदार मदतनीस कर्मचारी पुरविणे कामी मान्यता देवून ई-निविदा सुचना क्र.२/२०१४-२०१५ च्या अटी व शर्ती नुसार व मान्य केलेल्या दरानुसार व वेळोवेळी जानेवारी, जुलै मध्ये लागू होणा-या महागाई भत्ता (विशेष भत्ता) नुसार रखवालदार मदतनीस कर्मचारी यांची स्थायी समीतीने मान्यता दिलेनंतर विभागाच्या सोयीच्या तारखेपासून ते दिनांक ३१/१२/२०१६ अखेर तैनात करणेकामी त्या वेतनपोटी होणारे खर्चास मान्यता देणे बाबत विचार करणे.

विषय क्र. ८) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.०६.०६.२०१६ ते दि.१२.०६.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा

मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९३/२०१६. दि.०१.०७.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र. ९) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.३०.०५.२०१६ ते दि.०५.०६.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९२/२०१६ दि.०१.०७.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र. १०) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५(१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२३.०५.२०१६ ते दि.२९.०५.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९१/२०१६ दि.०१.०७.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र. ११) महाराष्ट्र महापालिका अधिनियम मधील कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१३.०६.२०१६ ते दि.१९.०६.२०१६ अखेर संपणा-या आठवडयाचा मा.मुख्यलेखा परिक्षक यांनी क्र.मुलेप/६/कावि/९४/२०१६ दि.०१.०७.२०१६ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणे.

विषय क्र. १२) पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/११/७/२०१५-१६ मधील आकुर्डी येथील मैलाशुध्दीकरण केंद्राचे देखभाल व दुरुस्तीचे कामे करणे या कामासाठी मे.एच.एन.बी. इंजिनियर्स प्रा.लि. यांचेकडुन नि.र.रु.२,६८,१५,४४०/- (अक्षरी र.रु. दोन कोटी अडुसष्ठ लाख पंधरा हजार चारशे चाळीस फक्त) पेक्षा -५.५२% कमी या दराने करुन घेवून यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. १३) पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/११/४/२०१५-१६ मधील मोशी कचरा डेपोसाठी नेरी, नागपुर या संस्थेने बफर झोन संबंधी दिलेल्या अहवालामध्ये उपाययोजना राबविणेकामी आवश्यक कामे करणे २.डेपोभोवती ग्रीन बेल्ट तयार करणे. या कामासाठी मे.बी.व्ही.जी. इंडिया लिमिटेड यांचेकडुन नि.र.रु.१,३९,८५,३८३/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणचाळीस लाख पंच्याऐंशी हजार तीनशे त्र्याऐंशी फक्त) पेक्षा -३.००% कमी या दराने करुन घेऊन यांचेसोबत करारनामा करुन कामाचे आदेश देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. १४) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र. १७/१३/२०१५-१६ मधील अ.क्र.७ अन्वये प्रभाग क्र.१२ अंतर्गत मिलिंदनगर, बौध्दनगर, राहुलनगर, दळवीनगर येथे पाणीपुरवठा सुधारणाकामी डी.आय.पाईप लाईन टाकणे. व त्या अनुषंगीक कामे करणे या कामासाठी मे. युनिक ट्रेडर्स निविदा रक्कम रू.४२,०१,६५०/- (अक्षरी-

बेचाळीस लाख एक हजार सहाशे पन्नास फक्त) पेक्षा २५.६६% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु.३२,७९,६८२/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणे बाबत विचार करणे.

विषय क्र. १५) मनपाच्या पाणीपुरवठा विभागाच्या नि.नो.क्र.१७/१३/२०१५-१६ मधील अ.क्र. ११ अन्वये अ प्रभागांतर्गत सन २०१४-१५ साठी पवना नदीमध्ये वरच्या बाजूस अशुद्ध जलउपसा केंद्राच्या जवळ गाळ काढणे या कामासाठी मे. महाराष्ट्र अंडर वोटर सर्व्हिसेस निविदा रक्कम रू.३४,९०,९४८/- (अक्षरी र.रु.चौतीस लाख नव्वद हजार नऊशे अठ्ठेचाळीस फक्त) पेक्षा १.००% कमी दराने या ठेकेदाराकडून निविदा मंजूर दराने र.रु. ३४,५६,०३८/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्याच्याबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणे बाबत विचार करणे.

विषय क्र. १६) मा.आयुक्त यांचे कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक आल इन वन संगणक संच-०१ नग, आल इन वन प्रिंटर-०१ नग व एमएस ऑफिस २०१० प्रोफेशनल-०१ नग आवश्यक संगणक साहित्य खरेदी करणेकामी कोटेशन नोटीस क्र.०८/२०१६-१७ अन्वये लघुत्तम कोटेशनधारक मे.मोनार्च टेक्नॉलॉजी प्रा.लि,पुणे-०४ यांचेकडून आवश्यक संगणक साहित्य खरेदीकामी एकूण र.रू.१,३३,३००/- दर स्विकृत करणेत आले असून करारनामा करणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. १७) क क्षेत्रिय स्थापत्य विभागाकडे निविदा नोटिस क्र. ३/२५ २०१५-१६ प्रभाग क्र.३९ संत तुकाराम मधील मुख्य व अंतर्गत रस्त्याचे डिव्हायडर व कर्ब पेंटींग करणे. मे. हरिषकुमार आर.गायकवाड यांना र.रु.७,४६,६२९/- (अक्षरी र.रु सात लाख शेहचाळीस हजार सहाशे एकोणतीस फक्त) पेक्षा ४०.००% कमी दराने नियमानुसार व निविदेतील अटि शर्ती प्रमाणे भाववाढ कमाल मर्यादा मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा /वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. १८) क क्षेत्रिय पाणीपूरवठा विभागाकडील निविदा नोटिस क्र.४/१ अन्वये–प्रभाग क्र. ६२ या भागातील पाणीपूरवठा व देखभाल दुरूस्ती करणेकामी मे. बरखा एंटरप्रार्जेस

नि.र.रु.५,५९,७०३/- (अ.र.रु पाच लाख एकोण साठ हजार सातशे तीन फक्त) पेक्षा ३४.९९% कमी या दराने ठेकेदारास कारारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले आसल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. १९) क क्षेत्रिय पाणीपूरवठा विभागाकडील निविदा नोटिस क्र.४/६ अन्वये – प्रभाग क्र. ३९ या भागातील पाणीपूरवठा व देखभाल दुरूस्ती करणेकामी मे. बरखा एंटरप्रार्जेस नि.र.रु.५,५९,७०३/- (अ.र.रु पाच लाख एकोण साठ हजार सातशे तीन फक्त) पेक्षा 34.99 % कमी या दराने ठेकेदारास कारारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले आसल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. २०) क क्षेत्रिय पाणीपूरवठा विभागाकडे निविदा नोटिस क्र.४/२ अन्वये – सन २०१५-१६ करिता दापोडी परीसरामध्ये देखभाल दुरूस्तीचे काम करणेकामी मे. बालाजी इंजिनिअर्स नि.र.रु.५,५९,९०५/- (अ.र.रु पाच लाख एकोन साठ हजार नऊशे पाच फक्त) पेक्षा ३०.००% कमी या दराने ठेकेदारास कारारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले आसल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. २१) क क्षेत्रिय पाणीपुरवठा विभागाकडील नि.नो.क्रं.४/२ २०१४-१५ अन्वये वा.क्र.६३ कासारवाडी या भागात पाणी पुरवठा देखभाल दुरूस्ती विषयक कामे करणेकामी मे. जितेद्र पुरूषोत्तम पाटील नि.र.रू.५,५८,०७५/- (अक्षरी र.रू पाच लाख आठ्ठावन्न हजार पंच्च्याहत्तर फक्त) पेक्षा ४२.८०% कमी या दराने नियमानुसार व निविदेतील अटि शर्ती प्रमाणे करारनामा करुन घेण्यात आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. २२) क क्षेत्रिय पाणीपूरवठा विभागाकडील निविदा नोटिस क्र.४/१० अन्वये – प्रभाग क्र. ४० या भागातील पाणीपूरवठा व देखभाल दुरूस्ती करणेकामी मे. दृष्टी कन्ट्रक्शन नि.र.रु.५,५९,७०३/- (अ.र.रु पाच लाख एकोन साठ हजार सातशे तीन फक्त) पेक्षा ३४.९९% कमी दराने या ठेकेदारास कारारनामा करुन कामाचा आदेश देण्यात आलेले आसल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र. २३) आकुर्डी रुग्णालयात व तालेरा रुग्णालयात स्त्री रोग तज्ञ पदाची अवश्यकता विचारात घेता डॉ.रन्ना दानप्पा, स्त्रीरोगतज्ञ यांना आकुर्डी रुग्णालयात व डॉ. संदीप भट, स्त्रीरोगतज्ञ यांना तालेरा रुग्णालयात मानसेवी तज्ञ वैद्यकीय अधिकारी पदावर दरमहा एकत्रित र.रु. ५०००/- या मानधनावर आदेशाच्या दिनांकापासून ६ महीने या कालावधीसाठी नेमणुक देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. २४) वायसीएमएच/सर्व्हर/कावि/१५/२०१६ दि.१८/०२/२०१६ च्या पत्रान्वये रूग्णालया करिता प्रिंटर हेड व रिबन्सची मागणी नोंदवलेली आहे. पत्रामध्ये सद्यस्थितीत ५

कॅश काऊंटर कार्यान्वित असून दोन शिफ्ट मध्ये कामकाज चालु कळविलेले आहे. तसेच प्रत्येक वॉर्ड मध्ये ऑनलाईन बिलिंग सिस्टीम चालु करण्यात आलेली आहे. प्रिंटरची मागणी वाढलेली असले कारणाने प्रिंटर रिबन्सबाबतची मागणी कळविलेले आहे. माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विभागाकरिता हार्ड डिस्कची आवश्यकता असले कारणाने हार्ड डिस्क खरेदी करणे आवश्यक आहे. त्यानुसार दरपत्रक मागवून होणारा संभाव्य खर्च ८७,८४०/- आहे. त्यानुसार कोटेशन प्रसिध्द करण्यात आलेले होते. त्यानुसार एकूण ०५ कोटेशन प्राप्त झालेली आहेत. सदरची कोटेशन मा.अतिरीक्त आयुक्त यांचे समक्ष उघडणेत आले असता त्यामध्ये मे.एम. के. एंटरप्रायझेसयांचे दर लघुत्तम प्राप्त झालेले आहेत. र.रू.५९,९९२/- सदरचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३१.७०% ने कमी आले आहेत. सदरच्या दर स्विकृतीस मा.अतिरिक्त आयुक्त सो.यांनी मान्यता दिलेली आहे. वायसीएम रूग्णालयाकरिता रिबन्स व हार्ड डिस्क खरेदी करणेकामी व त्या कामाकरिता येणा-या र.रू.५९,९९२/- इतक्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. २५) गणेशोत्सव स्पर्धा २०१५ मध्ये घेण्यात आलेल्या होत्या. भाग घेतलेल्या मंडळातून बक्षीस पात्र मंडळांना प्रशस्ती पत्रके, धनादेश, स्मृतिचिन्हे इ. देवून सन्मानित करण्यासाठी विशेष जाहिर कार्यक्रम दि.०९/०७/२०१६ रोजी मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार असून त्यासाठी येणा-या स्मृतिचिन्हे, प्रशस्तीपत्रके, बॅनर, फ्रेमरेन्ट, मान्यवर चहापान, नाष्टा, भोजन इ. साठी थेट पध्दतीने होणा-या र.रु.१,२०,०००/- (अक्षरी र.रु. एक लाख वीस हजार फक्त) खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. २६) मनपाचे वाय.सी.एम. रुग्णालयातील प्रयोगशाळा व रक्तपेढीकरीता तसेच इतर रुग्णालयाकरीता / दवाखान्याकडून आलेल्या मागणीचा विचार करता सदरची बाब तातडीक असल्याने आणि नवीन निविदा अंतिम झालेली नसल्याने मे.माहेश्वरी सेल्स् कार्पोरेशन यांना वाढीव कामाचेआदेश देण्यात आलेले होते. सध्या काढण्यात <u>आलेल्या</u> निविदेची कार्यवाही पूर्ण होवून संबंधिता बरोबर करारनामा करुन कामाचा आदेश निर्गमित करण्यात आलेला आहे. त्यामुळे झालेल्या वाढीव कामाचे र.रु. २०,४६,५५७/- खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. २७) मनपाच्या झोनिपु स्थापत्य विभागाकडील नि.नो. क्र.४/२३-२०१५-१६ मधील अ.क्र.१६ अन्वये प्रभाग क्र.८ दत्तनगर झोपडपट्टीमधील बनसोडे निवास येथील जूने संडास ब्लॉक पाडून २६ सिट्स नविन सूलभ शौचालय बांधणे.कामी. मे. श्रीयश कंन्स्ट्रक्शन नि.र.रु ३२,६७,५०६/- (अक्षरी र.रु.बत्तीस लाख सहूसष्ठ हजार पाचशे सहा फक्त) पेक्षा ११ % कमी) या ठेकेदाराकडून निविदा मजुंर दराने र.रु.२९,०८,०८०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक

दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ / घट दरानुसार फरकाची रक्कम अदा / वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. २८) मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या समवेत विधानभवन, पुणे येथे दि.१३ मे २०१६ रोजी बैठक झाली सदर बैठकीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध प्रश्न / विषयाबाबतचे प्रेझेन्टेशन सादर करणेत आले आहे. सदर प्रेझेन्टेशनच्या ५० सेटस मे.सिध्दी कॉपीअर्स अँड स्टुडंट कन्जूमर स्टोअर, पिंपरी-१८ यांच्याकडून तयार करणेत आले आहेत त्या अनुषंगाने मे.सिध्दी कॉपीअर्स अँड स्टुडंट कन्जूमर स्टोअर, पिंपरी-१८ यांना बील र.रु. ३६,६५०/- (अक्षरी र.रु. छत्तीस हजार सहाशे पन्नास फक्त) अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. २९) मा.जिल्हा न्यायालय शिवाजीनगर कोर्ट पुणे, येथील पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या नावे असलेल्या चेंबर नं. ५२ च्या, सी बिल्डींगचे सन २०१६-२०१७ या वर्षाचा बिल्डींग देखभाल खर्च प्रति चेंबर र.रु.१०,०००/- प्रमाणे महापालिकेच्या हिस्स्याची र.रु.१०,०००/- (अक्षरी र.रु. दहा हजार फक्त) अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र. ३०) मनपाचे वतीने आयोजीत केलेल्या महिला महोत्सव २०१६ करीता प्रस्तावात नमूद प्रमाणे मानपात्र, मोमेंटोज व बॅजेस तात्काळ मे. महाकाळ अन्ड कंपनी यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदी / बनवून घेणेत आलेले आहेत. त्याकरीता एकूण र.रू.१५,९००/- (अक्षरी र.रू. पंधरा हजार नऊशे फक्त) एवढा खर्च आलेला आहे. सदर आलेल्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/५२७/२०१६
दिनांक - ०८/०७/२०१६.

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.